F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४८६/४८७
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे**

क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४८९
दिनांक : २० / १२/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **महाडीबीटी पोर्टलद्वारे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत....**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४५६ दि.१७/११/२०२१
२. महाआयटी यांचेकडून दि. १४ /१२/२०२१ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.

सन २०१८-१९ या वर्षासाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** ( संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in ) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

संदर्भीय ईमेलनुसार **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता**, विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु महाडीबीटी पोर्टलद्वारे सुरु करण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले असून विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची **अंतिम मुदत दि ३१/०१/२०२२ पर्यंत** आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, पात्र विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घेण्याबाबत सूचित करावे. जेणेकरुन सर्व पात्र विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करता येईल.

तसेच **शैक्षणिक वर्ष २०२०-२१** च्या, ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना **दि. ३१/०१/२०२२ पर्यंत** Re-apply करता येईल.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सृ.विनय सादर.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

# MahaDBT Portal Started for 2021-22. Last Date for Application Acceptance from Candidates is 31.01.2022

